महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४१ वा | दिनांक : २५/११/२०२५ | वार : सोमवार

## महायुतीतील एकजूट केवळ कागदोपत्रीच



मुंबई : सातारा जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकीत यंदा अपेक्षेपेक्षा अधिक गोंधळाचे आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी युती करत सामोपचाराचे चित्र उभे केले असले तरी, या दोन्ही गटांतील अनेक जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी मोठ्या प्रमाणात उसळली आहे. अनेक वर्ष निष्ठेने पक्षासाठी काम केले, निवडणुकांपासून सामाजिक उपक्रमांपर्यंत योगदान दिले, तरीही उमेदवारी दिली नाही, असा आरोप करत काही कार्यकर्त्यांनी थेट बंडखोरीचा मार्ग स्वीकारला आहे. दोन्ही राजेंच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधातच अपक्ष म्हणून उभे राहून त्यांनी निवडणुकीत खळबळ माजवली आहे. त्यामुळे साताऱ्यातील महायुतीतील एकजूट केवळ कागदोपत्रीच राहिली असल्याचे दिसून येत आहे.

शिवेंद्रराजे आणि उदयनराजेंचे मनोमिलन हे भाजपसाठी मोठे यश मानले जात होते. परंतु तळागाळातील कार्यकर्त्यांची नाराजी कमी न झाल्याने, संघटना स्तरावर मोठे तणाव निर्माण झाले आहेत. भाजपने अलीकडेच नवीन लोकांना पक्षात घेत मोठ्या मनाने तिकिटे दिली. या निर्णयाने जुन्या कार्यकर्त्यांची नाराजी आणखी भडकली आहे. काही ठिकाणी कार्यकर्ते थेट पत्रकारांसमोर येत, वर्षानुवर्षे आम्ही दोन्ही राजेंच्या मागे धावलो, पण वेळ आली तेव्हा आम्हाला विसरले, असा आरोप करताना दिसत आहेत. अपक्ष उमेदवारांनी उभारलेली ही बंडखोरी ३ डिसेंबरला होणाऱ्या मतमोजणीत किती परिणाम करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, सातारा जिल्ह्यात नऊ नगरपालिका आणि एका नगरपंचायतीमध्ये निवडणुकीचे घमासान सुरू आहे. सातारा, कराड, मलकापूर, वाई, फलटण, महाबळेश्वर, पाचगणी, म्हसवड, रहिमतपूर आणि मेढा नगरपंचायतीमध्ये प्रचार अत्युच्च बिंदूकडे पोहोचला आहे. प्रत्येक ठिकाणी स्थानिक नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात अनेक ठिकाणी थेट लढाई होत आहे. युती असली तरी तिकिटवाटपातील नाराजी आणि गटबाजी मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. त्यामुळे भाजपने राबवलेली व्यापक निवडणूक रणनीती तळागाळात अपेक्षित परिणाम करेल का? याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## परळी नगरपरिषद निवडणुकीत धनंजय मुंडेंच्या भाषणात कराडचा अप्रत्यक्ष संदर्भ



**बीड** : परळी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा भव्य कार्यकर्ता मेळावा रविवारी उत्साहात पार पडला. या मेळाव्यास पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी संयुक्त उपस्थिती दर्शवून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य भरले. दोन्ही नेते एकत्र व्यासपीठावर आले असल्याने परळीतील राजकारणाला वेगळी दिशा मिळणार का? याची उत्सुकता निर्माण झाली. सभास्थळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत उमेदवारांना पाठिंबा दर्शवला. महायुतीने परळीत एकसंघतेचा संदेश देत ही निवडणूक प्रतिष्ठेची असल्याचे स्पष्ट केले.

मेळाव्यात बोलताना धनंजय मुंडे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. मागील काही महिन्यांपासून परळीवर झालेल्या टीका, आरोप आणि वादांचा उल्लेख करून त्यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीचे आवाहन केले. परळीला गेल्या वर्षभरात अनावश्यक बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. परळीकरांनी त्याला ठाम उत्तर द्यायचे आहे, असे ते म्हणाले. त्यांनी आपल्या राजकीय जीवनातील संघर्षाचे उदाहरण देत, प्रत्येक निवडणूक मनापासून लढवल्याचा उल्लेख केला. येथील मातीसाठी प्राणही द्यावे लागले तरी मी मागे हटणार नाही, असे विधान करत त्यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. त्याचवेळी दहा महिन्यांपासून जगमित्र कार्यालय सुरू आहे, पण आज तिथे एकही माणूस नाही, असे वक्तव्य करत त्यांनी नाव न घेता काही व्यक्तींवर अप्रत्यक्ष टोला लगावला. या विधानानंतर वाल्मिक कराड प्रकरणाची चर्चा पुन्हा रंगू लागली.

धनंजय मुंडेंनी बोलताना महायुतीच्या उमेदवारांच्या विजयाची जबाबदारी स्वतःवर आणि पंकजा मुंडे यांच्यावर असल्याचे सांगितले. त्यांनी परळीत सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा देत, पुढील वर्षभरात आणखी मोठे प्रकल्प प्रत्यक्षात दिसतील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ऐतिहासिक विजय नोंदवून परळीला नवे स्थान मिळवून द्यायचे आहे, असेही ते म्हणाले. त्यांनी विरोधकांवर टीका करत, व्हिजन नसलेल्या लोकांना परळीचा विकास समजणार नाही, असे म्हणत सभेतील वातावरण तापवले. त्यांच्या भाषणादरम्यान कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात जल्लोष व्यक्त केला.

## गुंतागुंतीच्या जगातला सरळ माणूस हरपला: 'वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचे प्रतीक ; शरद पवार



**मुंबई** : ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे आज प्रदिर्घ आजाराने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांनी मुंबईतील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक नेत्यांनी धर्मेंद्र यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. धर्मेंद्र यांच्या रुपाने सिनेसृष्टीने एक अतिशय देखणा, सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा असणारा, पण त्यात कुठेही दांडगाई नसणारा हिरो गमावला, अशी भावना या नेत्यांनी व्यक्त केली आहे.

शरद पवार अभिनेते धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहताना म्हणाले, १९६० च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून चित्रपटात सर्वसामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कथानकांमधून उठावदार भूमिका साकारणारे आणि भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकून सिनेजगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र देओल यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली. आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती. 'शोले'मध्ये त्यांनी साकारलेला 'वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचं प्रतीक आणि तडफदार नायक म्हणून भारतीय रसिकमनांवर अधिराज्य गाजवतो आहे.

अनेक वेळा 'शोले'मधील त्यांचा पाण्याच्या टाकीवरील खुमासदार प्रसंग आजही आमच्या राजकीय क्षेत्रात उत्साही कार्यकर्ते आंदोलन म्हणून अंगिकारतात. 'धरम वीर', 'चुपके चुपके', 'सत्यकाम', 'अनुपमा', 'मेरा गाँव मेरा देश' आणि 'ड्रीम गर्ल' ह्यासारख्या जवळपास २५० सुप्रसिद्ध कलाकृतीत धर्मेंद्र ह्यांनी साकारलेल्या भूमिका कायम स्मरणात राहतील. सिनेसृष्टीच्या 'धरम पाजीं'ना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व देओल कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी धर्मेंद्र यांच्या रुपाने सध्याच्या गुंतागुंतीच्या जगातला एक सरळ माणूस हरवल्याची भावना व्यक्त केली आहे. ते म्हणाले, ज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. एकापेक्षा एक सुपरहिट सिनेमे दिले, पण सुपरस्टारचं बिरुद त्यांना चिकटलं नाही म्हणा किंवा त्यांनी चिकटू दिलं नाही. मला चिकटू दिलं नाही असंच जास्त वाटतं, कारण धर्मेन्द्रजींच्या बाबतीत त्यांचं प्रतिमेहून प्रत्यक्ष उत्कट असं होतं.

१९६० च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही, अशा एका व्यक्तिमत्वाचा एक तरुण पडद्यावर झळकला आणि पुढे कित्येक दशकं त्याने हिंदी चित्रपटसृष्टीवर गारुड केलं. करिअरच्या सुरुवातीलाच बिमल रॉय यांच्यासारख्या दिग्दर्शकासोबत काम करण्याचं भाग्य कितींच्या वाट्याला येतं? पुढे ऋषिकेश मुखर्जी, चेतन आनंद, रमेश सिप्पी, राज खोसला, मनमोहन देसाई यांच्यासारख्या अनेक दिग्दर्शकांना धर्मेंद्र आपला नायक असावा असं वाटणं यातच धर्मेन्द्रजींच्यातल्या अफाट क्षमतेचं दर्शन होतं. आणि सिनेमाच्या खूप गुंतागुंतीच्या जगातला हा एक सरळ माणूस होता आणि म्हणूनच सर्वसामान्यांनाही तो कायम आपला हिरो वाटत राहिला. त्यांच्या स्मृतीस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं विनम्र अभिवादन, असे राज ठाकरे म्हणाले.

# स. भु. पूर्व माध्यमिक विभाग स्नेहसंमेलन उद्‌घाटन संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध वर्तमानपत्रे आणि सामान्य ज्ञानाच्या पुस्तकांचेही वाचन करावे, स्पर्धा परीक्षा देण्यासाठी तुम्हाला ते उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ सहा. संचालक किरण धोत्रे यांनी केले. श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या पूर्व माध्यमिक विभागाच्या स्नेहसंमेलनाचे उदघाटक म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी उद्धाटन समारंभाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईतकर, विद्यार्थी संसद अध्यक्ष कु. तनिषा सूर्यवंशी, उपाध्यक्ष चि. कैवल्य चिंचोलकर, सांस्कृतिक प्रतिनिधी चि. गौरव पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना किरण धोत्रे पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनातील विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत या स्पर्धांचा आनंद घ्यावा, अनुभव घ्यावा. ते तुम्हाला जीवनात उपयोगी पडेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी संसद अध्यक्ष कु. तनिषा सूर्यवंशी हिने केले. उद्धाटनानंतर लगेचच विद्यार्थ्यांचे वैयक्तिक नृत्य, फॅन्सी ड्रेस आदी स्पर्धांना सुरुवात झाली. या स्पर्धांचे सूत्रसंचालन कु. श्रेया खेडकर आणि कु. क्षितिजा काळे यांनी केले. उद्धाटन समारंभाचे सूत्रसंचालन दिपाली सोळंके यांनी केले. आभार प्रदर्शन कैवल्य चिंचोलकर याने केले.

# कन्नड येथे सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवाचे आयोजन



**कन्नड (अरुण थोरात): :** लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या पुण्यतिथी निमित्त २५ व २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वा. सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सवाचे आयोजन सहकार महर्षी बाळसाहेब पवार वाचनालय कन्नड व बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे. कन्नड तालुक्यातील प्रतिभावंत विद्यार्थी कलावंताचा शोध घेऊन त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हा महोत्सव आयोजित केला जातो. तालुक्यातील विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. या संगीत महोत्सवाच्या उदघाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सोमीनाथ खाडे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित सर यांची उपस्थिती लाभणार आहे. समारोप व बक्षिस वितरणासाठी (ता. २६ ) प्रमुख पाहुणे श्रीमती अपराजिता अग्निहोत्री सहाय्यक पोलीस अधिक्षक उपविभाग कन्नड या उपस्थित राहाणार आहेत. हा संगीत महोत्सव स्पर्धात्मक असून विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या संगीत महोत्सवास दोन्हीही दिवस विद्यार्थी, युवक, पालक आणि सर्वांनीच उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


# सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर शिक्षकांचे भवितव्य धोक्यात; ५ डिसेंबरला राज्यव्यापी मोर्चा

**छत्रपती संभाजीनगर :** (संपूर्ण देशामध्ये सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर शिक्षण व्यवस्थेत कार्यरत प्राथमिक, माध्यमिक, खाजगी, न.पा. /मनपा/ आश्रमशाळा शिक्षकांच्या भवितव्यापुढे आणि एकूणच व्यवस्थेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काही संस्था व संघटनांनी याचिका दाखल केल्या आहेत. हे करताना राज्य सरकारला थर्ड पार्टी केले आहे.त्यामुळे राज्य शासन याबाबतीत एकाच वेळी दोन विभिन्न भूमिका घेऊ शकत नाही. त्यामुळे राज्य शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करावी ही पहिल्या टप्प्यात घेतलेली भूमिका आता मागे पडली आहे. अशा परिस्थितीत NCTE ने TET संदर्भात अधिसूचना निर्गत करण्यापूर्वी शिक्षक म्हणून सेवेत कार्यरत असलेल्या संपूर्ण देशातील प्राथमिक शिक्षकांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाने शिक्षण हक्क कायद्यात तसेच NCTE संबंधी अधिसूचनेत दुरुस्ती करणे अनिवार्य आहे. यादृष्टीने केंद्राच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या विषयाची तीव्रता व गांभीर्य अधोरेखित करण्यासाठी शुक्रवार दि. 5/12/2025 रोजी शाळा बंद ठेवून संपूर्ण राज्यात विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. हा विषय आपल्या राज्यातून संसद सदस्य म्हणून कार्यरत लोकप्रतिनिधी पर्यंत व्यापक स्वरुपात पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती , शिक्षक संघ थोरात गट, जुनी पेन्शन संघटनासह राज्यातील जवळपास 35 प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटनांनी एकत्र येऊन हे आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे. राज्य स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर कार्यरत इतर सर्व मित्र संघटनांना देखील सोबत घेण्यासाठी संवाद व चर्चा सुरु केली आहे. सर्वांना सोबत घेऊन हे आंदोलन व त्याची तीव्रता याचे पडसाद राज्यासह नवी दिल्ली पर्यंत पोहचले पाहिजेत अशा पद्धतीने सर्वजण मिळून कामाला लागले पाहिजे. या भव्य आंदोलनात आपल्या जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना देखील हजर राहून आपल्या भूमिका समजून घेण्याची विनंती केली जाईल. ही लढाई अस्मिता आणि अभिमानाची नाही तर शिक्षक समूहाचे आस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी आहे.....याचे भान ठेवून अभिनिवेश बाजूला ठेवून सगळेजण एकोप्याने या संकटाला सामोरे जाऊयात ! काल रविवारी हो/नको म्हटलं तरी खूप मोठ्या संख्येने टीईटी परिक्षेला सामोरे गेले होते. तुम्ही शैक्षणिक अर्हता आणि निवड मंडळाची परीक्षा देऊनच सेवेत आलेले आहात.....पण अंगावर झाडाचं पान पडले तरी आभाळ पडले समजून धूम ठोकण्याची सवय आम्हाला झाली आहे. परीक्षा देऊ नका म्हटलं तरी ऐकणार नाहीत हे माहिती होतेच म्हणून संघटना म्हणून आम्ही रोखण्याचा प्रयत्न केला नव्हता. उलट परीक्षेला सामोरे जाणाऱ्या शिक्षकांना अनेक संघटना प्रतिनिधींनी शुभेच्छा देखील दिल्या. मात्र परीक्षा केंद्रातून बाहेर पडताच हजारो शिक्षकांनी वेगवेगळ्या संघटना प्रतिनिधींना फोन करुन तुमच्या शुभेच्छा काही कामाला आल्या नाहीत...... नेते, काही तरी करा असे फोन खणाणू लागले आहेत. असो......देर आये दुरुस्त आये या भूमिकेतून सगळे मिळून येणाऱ्या काळात एकोप्याने काम करुन दि. 5 डिसेंबर रोजी होणाऱ्या आंदोलनात सर्वांना सोबत घेऊन आंदोलन यशस्वी करण्यासाठी सिद्ध होऊया इतकेच !

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५


## मा. सरपंच अनंतराव हुसे यांची खरेदी विक्री संघावर बिनविरोध निवड



**अंबड :** अंबड तालुका खरेदी विक्री संघावर सदस्य म्हणून देशगव्हाण येथील मा. सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अनंतराव हुसे यांचा सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती तर्फे सुखना नदीकाठी वाकुळणी - माहेर भायगाव शिवारातील निळकंठेश्वर मंदिरात शाल , व तिफणचा लोककला विशेषांक भेट देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. शिवाजी हुसे म्हणाले की, सुखनाकाठची माणसं विविध क्षेत्रात मोठी झाली पाहिजे. आजपर्यंत सुखनाकाठच्या गावावर विकास योजना व कार्यकर्त्यांना फार संधी राजकीय क्षेत्रात मिळाली नाही. अनंतराव हुसे यांच्या निवडीबद्दल आम्हास सार्थ अभिमान आहे. प्रास्ताविक समितीचे सदस्य सोपान कोळकर यांनी केले. अनंतराव हुसे सत्काराला उत्तर देतांना म्हणाले की, आपण केले ला हा सत्कार माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. सुखना नदी संवर्धनासाठी मी समिती सोबत आहे. असेही ते म्हणाले.यावेळी शिवाजीराव कराड (मा. प. समिती सदस्य ) , डॉ. सर्जेराव जिगे,प्रा. डॉ. अशोक हुसे, प्रा. डॉ. राम रौनेकर, ग्रामसुराज्य फाऊंडेशनचे संचालक प्रकाश चोले, सोपान कोळकर,प्रकाश हुसे, गजानन दाभाडे, अनिल वावरे , प्रा. संदीप हुसे, नितीन हुसे, दत्तू अवघड यांची उपस्थिती होती.

## सुखना नदीकाठी 'धोंडी धोंडी पाणी दे!' कविता संग्रहाचे लोकार्पण



**बदनापूर : (प्रतिनिधी) :** तिफण साहित्य संवाद उपक्रमांतर्गत वाकुळणी–माहेर भायगाव शिवारातील सुखना नदीकाठी प्रा.डॉ.शिवाजी हुसे यांच्या 'धोंडी धोंडी पाणी दे!' या पाणी विषयक संपादित कवितासंग्रहाचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. निळकंठेश्वर मंदिर परिसरात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.सर्जेराव जिगे यांनी भूषविले, तर लोकार्पण पाणी प्रश्नांचे अभ्यासक,जलतज्ञ प्रकाश चोले तसेच प्रा.डॉ. राम रौनेकर, प्रा.डॉ.अशोकराव हुसे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रा.डॉ. शिवाजी हुसे यांनी कवितासंग्रहाच्या निमित्ताने व सुखना नदी संवर्धनासंबंधी भूमिका मांडली. डॉ. सर्जेराव जिगे यांनी नदी, पाणी यांचे महत्व सांगून संग्रहावर भाष्य केले.सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती व तिफण वाचक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमामध्ये साहित्य, पर्यावरण व समाज यांच्यातील सुसंवादाचा संदेश देण्यात आला. नदीकाठची वारसा स्थळे जपण्याची व त्यांना पर्यटनस्थळांप्रमाणे विकसित करण्याची गरज यावरही चर्चा करण्यात आली.यावेळी प्रकाश चोले यांनी सुखना नदी संवर्धन, पाणी व्यवस्थापन, अवैध वाळू उपसा आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. नदी पुनरुज्जीवनाची चळवळ अधिक व्यापक होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्राध्यापक डॉ. राम रौनेकर यांनी आपल्या भाषणात संत-साधूंनीही जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केल्याचे सांगितले. यावेळी समिती तर्फे अनंतराव हुसे यांची अंबड तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात सुखना नदी संवर्धन व पुनरुज्जीवन, नदीकाठचा परिसर विकास, शेतकऱ्यांच्या अडचणी, अवैध वाळू उपसा या गंभीर विषयांवर विचारमंथन झाले. यात पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली.या प्रसंगी माहेर भायगावचे सरपंच अर्जुन वाघ, शिवाजीराव कराड, अनंत हुसे, विठ्ठलराव लबडे, अर्जुनराव लबडे,लक्ष्मण वाघ, सुधीर कोळकर, दत्तात्रय अवघड, प्रकाश हुसे, रामनाथ शेळके तसेच सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीचे सदस्य प्रा.संदीप हुसे,सोपान कोळकर, अनिल वावरे, गजानन दाभाडे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन सोपान कोळकर यांनी तर आभार नितीन हुसे यांनी मानले.

## फुलांचा राजा

किती मनमोहक  
गुलाबाचे फूल  
रूप त्याचे देखणे  
मनास पडे भूल

सकाळी सकाळी  
बागेत भेटतो  
हवाहवासा  
सर्वांना वाटतो

दुःख विसरून  
काट्यातही फुलतो  
मंद हवेत  
आनंदाने डुलतो

सुगंध त्याचा  
चौफेर दरवळे  
त्याला पाहताक्षणी  
दुःख दूर पळे

फुलांचा हा राजा  
मोठा भारी रूबाब  
विविध फुलांमध्ये  
खुलून दिसतो गुलाब




- रवींद्र चालीकवार  
मु.पो.ता.महागाव  
जि.यवतमाळ  
मो.9011559106



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## बिबट्यांचा संचार असलेल्या भागात दिवसा वीज पुरवठा करा



**कन्नड (अरुण थोरात) :** बिबट्यांचा संचार असलेल्या भागांत शेती पंपाना दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी कन्नड तालुका संघर्ष समिती अध्यक्ष तथा मा.जि.प. अध्यक्ष डॉ. आण्णासाहेब शिंदे व शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.या संदर्भात दि. २४ नोव्हेंबर रोजी वीज वितरण चे कार्यकारी अभियंता कन्नड तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, औराळा विभागांतर्गत औराळा, वीटा, साकेगाव, पळसखेडा, खामगाव, तसेच देवगाव रंगारी केंद्रांतर्गत विटखेडा, चांभारवाडी, बोरसर, देवगाव, ताडपिंपळगाव, देभेगाव, आदी गावे, टाकळी केंद्रांतर्गत केसापूर, टाकळी, जैतापूर, देभेगाव, देवळाना या परिसरात बिबट्याने अनेक पाळीव जनावरांच्या शिकारी केल्या आहेत. तसेत शिवना टाकळी मध्यम प्रकल्प, खारीखामगाव प्रकल्प, देवगाव प्रकल्प, खेडा प्रकल्प या प्रकल्पांमुळे परिसरात ऊस पिकाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे बिबटे, लांडगे, आदी प्राण्यांनी शंभर पाळीव जनावरांच्या शिकारी केल्या आहेत. त्यामुळे या परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. शेतकर्यांना गहू, हरभरा, ऊस, कांदा, भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागते. यागोदर बिबट आदी हिंस्र प्राण्यांनी भांबरवाडी, साकेगाव, पळसखेडा इत्यादी गावांमध्ये माणसांचा बळी घेतला आहे. या सतत च्या हल्ल्यांमुळे शेतकरी भयभीत होऊण शेती करणे अवघड झाले आहे. त्यामुळे बिबट्यांचा वावर असलेल्या औराळा, देवगाव, चापानेर, टाकळी, जेहूर, वडनेर या सर्व ३३ के.व्ही. केंद्रात शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करुन शेतकर्यांना न्याय द्यावा. शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा करण्यात यावा. वन विभागाने गस्त वाढवून, पिंजरे लावून पकडून न्यावे. याबाबत कारवाई न केल्यास शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल यास वीज वितरण कंपनी व वनविभाग जबाबदार राहिल असा इशारा या निवेदनात डॉ. आण्णासाहेब शिंदे, गोकुळ गोरे, गणेश सोनावणे, प्रकाश आहेर, अशोक कुमावत, दादासाहेब आहेर यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५


## अय्युब पठाण यांचा भव्य सत्कार



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : सुप्रसिध्द बाल साहित्यिक तथा बालभारतीच्या पाठयपुस्तकातील कवी अय्युब पठाण लोहगावकर हे गेल्या चाळीस वर्षापासून मराठीत सातत्याने लेखन करून आता पर्यंत त्यांचे पंधरा पुस्तके प्रकाशित आहे. त्यामध्ये सहा बालकवितासंग्रह, पाच प्रौढ कविता संग्रह, आणि चार बालकथासंग्रहांचा समावेश आहे. या मराठीलेखनातील योगदानाबद्दल बिडकीन येथील कला महाविद्यालयाचे प्राध्यापिका तथा मराठी विभाग प्रमुख श्रीमती डॉ. अर्चना सोनवणे- काटे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. सर्जेराव जिगे यांच्या हस्ते शाल व पुष्प बुके देऊन अय्युब पठाण लोहगावकर यांचा छत्रपती संभाजीनगर येथे भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तिफनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे, सचिव सुनिल डोके, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कवी मनोज खुटे, गिरीष जोशी, डॉ. दैवत सावंत, कवी संदीप ढाकणे, माजी पोलीस आयुक्त श्री. चंपालाल शेवगण, कवी अशोक शेवगण, कवयित्री ज्योती सोनवणे, माधुरी चौधरी, कस्तुरी कुलकर्णी- जोशी व इतर साहित्यिक रसिक यांची कार्यक्रमाला उपस्थिती होती

## मुरूम येथील पाटील यांच्या एचएफ गायीला राज्यस्तरीय प्रथम क्रमांक



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : येथील श्वेता बापूराव पाटील यांच्या एचएफ गायीने दूध स्पर्धेत राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावले आहे.नागपूर येथे अँग्रोव्हिजन आयोजित कृषी प्रदर्शनात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी,केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते श्वेता पाटील यांचे प्रतिनिधी नागवेणी पाटील यांचा १५ हजार रुपये,मदर डेअरीची ट्रॉफी आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी कृषी मंत्री दत्ता भरणे,मंत्री पंकजा मुंडे,राज्यमंत्री आशिष जैस्वाल,डॉ पंकज भोयर,एनडीबीबीचे डॉ मनीष शहा आदींची प्रमुख उपस्थिती होती.निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय दिवसेंदिवस तोट्यात येत आहे.परिणामी कर्ज वाढल्याने शेतकरी आत्महत्याचे प्रमाण वाढत चालले आहे.यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांना आर्थिकरीत्या मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारच्या मदतीने मदर डेअरीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय,शेती पूरक व्यवसाय,शेतमाल विपणन,गटशेती,जैविक शेती आदी विषयावर मार्गदर्शन करत वित्त पुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.यातूनच गेल्या दहा वर्षापासून एग्रोविजन च्या पुढाकाराने कृषी प्रदर्शन भरवले जात आहे.जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील यांना राजकारणा बरोबरच पशुपालनाची आवड आहे.कोरोना काळापासून त्यांची कन्या श्वेता पाटील यांनाही दुग्ध व्यवसायात आवड निर्माण झाली.त्यांनी आपल्या शेतात ८ एचएफ गार्यीपासून दुग्ध व्यवसाय सुरू केले.आज रोजी त्यांच्या गोठ्यात ७० गायी आणि २५ वेगवेगळ्या जातीच्या म्हशी आहेत.नुकतेच मदर डेअरीच्या माध्यमातून राज्यभरात दुध स्पर्धा घेण्यात आली.यामध्ये त्यांच्या गोठ्यातील ४४ लिटर दुध देणाऱ्या एचएफ गायीने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावले आहे.पाटील यांनी सुरू केलेले दुग्ध उद्योग आजच्या दुग्ध व्यवसायात येणाऱ्या तरुणांसाठी आदर्श ठरत आहे.चौकट १मुरूमसह परिसरातील दुग्ध व्यवसाय करू इच्छिणारे युवक पाटील यांच्या शेतात भेट देऊन गोठा,गायी,म्हशी याबरोबरच यांचे चारापाणी चे नियोजन आदी माहिती घेत असतात.या युवकांना बापुराव पाटील हे स्वतः शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय करण्यासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देत व्यवसाय सुरू करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन करतात.चौकट २आज रोजी आमच्याकडे दररोज ४४ लिटर दूध देणारी एचएफ गाय आहे.आणखी दोन गायी पुढील महिन्यापासून दररोज प्रत्येकी ६० लिटर दुध देण्याची अपेक्षा आहे.सध्या ८०० लिटरच्या जवळपास दररोजचे दूध संकलन आहे.महिनाभरात १६०० लिटरचा टप्पा गाठणार आहोत. -श्वेता बापुराव पाटीलचौकट ३पाटील यांना पशुपालनातून वर्षाकाठी ७५० टन शेणखत मिळत आहे.आपल्या शेतात रासायनिक खतांऐवजी शेणखताचा वापर करून एकरी ८० ते ९० टन ऊस उत्पादन घेत आहेत.शेणखताचा वापरातून विषमुक्त शेती करण्यासाठी टाकलेले हे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेरिसस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ नोव्हेंबर २०२५

# महिलांवरील हिंसाचार आणि सामाजिक वास्तवता

**२५** नोव्हेंबर, म्हणजेच (International Day for the Elimination of Violence Against Women) महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिनाच्या पार्श्वभूमीवर, भारतातील महिलांवरील गुन्ह्यांविषयीचा ताजा अहवाल समजून घेणे गरजेचे आहे. National Crime Records Bureau (NCRB) यांनी प्रसिद्ध केलेल्या "Crime in India 2023" या अहवालात दाखवले आहे की या देशात महिलांविरुद्ध घडत असलेल्या घटनांचा केवळ कायद्याचा प्रश्न नसून ते सामाजिक संरचना, संस्कृती, आर्थिक व राजकीय परिस्थिती यांच्याशी खोलवर गुंतलेले आहेत. अहवालानुसार वर्ष २०२३ मध्ये महिलांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या ४,४८,२११ इतकी झाली आहे, जी २०२२ च्या ४,४५,२५६ पेक्षा किंचित अधिक आहे. या संख्या दर्शवतात की अशा गुन्ह्यांची वाढ थांबलेली नाही, उलट ती घटलेल्या नसून वाढत्या रूपात आहे. राष्ट्रीय पातळीवर प्रति लाख महिला लोकसंख्येमागील गुन्ह्यांचा दर ६६.२ इतका होता.या आकड्यांचा सामाजिक अर्थ असा आहे की महिलांचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक संबंध, सार्वजनिक स्थान हे सर्व असुरक्षिततेच्या छायेखाली आहेत. NCRB अहवालात सर्वात मोठा गुन्हा प्रकार नोंदवलेला आहे तो म्हणजे "पती किंवा त्याच्या नातेवाईकांद्वारे क्रूरता" (Cruelty by husband or his relatives) हा प्रकार अजूनही महिलांविरुद्ध होणाऱ्या अधीकृत गुन्ह्यांत सुमारे २९.८% पर्यंत आहे. याचा अर्थ असा की महिलांचे हिंसाचारातील मुख्य माध्यम हे बऱ्याच वेळा घरी, नातवंडीत, विश्वासाच्या परीघातच आहे. जेथे ती सुरक्षित असावी, त्या ठिकाणी तिच्यावर अत्याचार होतो. हे सामाजिक दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे कारण ते लिंगआधारित असमानता व पारंपरिक लिंगभूमिकांचे प्रतीक आहे.राज्यस्तरावर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची दिसते. उदा. उत्तर प्रदेशमध्ये २०२३ मध्ये महिलांविरुद्ध गुन्ह्यांची सर्वाधिक संख्या नोंदवली गेली आहे. काही राज्यांमध्ये प्रति लाख महिला किंवा एकूण किती प्रकरणे हाताळली जातात यातील फरक हा सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय भिन्नतेचा परिणाम आहे. बहुधा, ज्या ठिकाणी सामाजिक जागृती कमी आहे, पोलीस-तपासणे व नोंदणीचे यंत्रणा कमजोर आहेत, तिथे वास्तव घटना अजून जास्त असतात पण नोंद होतात कमी होते. हेही लक्षात घ्यावे लागेल की अधिक संख्या म्हणजे केवळ असुरक्षिततेचा वाढता प्रमाण नाही, तर ती त्या प्रदेशात महिलांना तक्रार करण्याचा भराव अधिक झाला आहे, असेही सांगू शकते म्हणजे कि नोंद वाढणे म्हणजे सामाजिक जागृतीचा दिवा पण असू शकतो.समाजशास्त्रीय दृष्ट्या, महिलांवरील हिंसाचाराचे कारण केवळ वैयक्तिक असंतुलन, व्यक्तिगतरूपी आव्हाने किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच नाही; हे सामाजिक-संस्कृती, आर्थिक असमानता, आणि लिंग-वाद्य संरचनांचा परिणाम आहे. उदा. अनेक सामाजिक संस्कृतीत महिलांना आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबित्व असणे, तिच्या अक्षमता किंवा निर्बलतेची धारणा असणे, आणि तिच्या सशक्त स्वरूपाला विरोध असणे अशा विविध पद्धतीने हिंसाचाराचा पाया घालतात. घरी पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून होणारी क्रूरता यामागे 'पतीचा अधिकार' किंवा 'घर चालवायची जबाबदारी' अशा जुनाट लिंगभूमिका वचनबद्ध असतात. अशा भूमिकांमध्ये महिला म्हणजे 'अधिकाऱ्याच्या मुलगी' किंवा 'घरच्या कामासाठी' अशी विशेष भूमिका बजावावी, अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा तिच्या स्वायत्ततेशी, निर्णय-स्वातंत्र्याशी, सामाजिक सहभागाशी छेडछाड करते. त्यामुळे तिच्या अस्तित्वाच्या विविध पैलूंवर म्हणजेच आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक दबाव निर्माण होतो.तसेच, हिंसाचाराचे स्वरूप बदलत चालले आहे. जरी अहवालात बलात्कार, किडनॅपिंग / अपहरण या प्रकारातील गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात घट दिसली असली तरी, ऑनलाईन हिंसा, सायबर छळ, तसेच सार्वजनिक व खाजगी ठिकाणी छेडछाडी यांसारखे प्रकार वाढण्याचा धोका दाखवतात. या बदलत्या स्वरूपामुळे पारंपरिक सुरक्षात्मक उपाय पुरेसे नाहीत, नवे धोके ओळखण्यासाठी सामाजिक-संस्थात्मक प्रतिसाद बदलावा लागणार आहे.NCRB अहवालानुसार, गुन्ह्यांची संख्या जरी थोडी वाढली असली तरी प्रक्रियात्मक कामगिरी अजून अपूर्ण आहे. उदा. देशातील चार्जशीटिंगचे प्रमाण २०२३ साली ७७.६% इतके होते. म्हणजे गावापासून महानगरापर्यंत पोलीस तपासणे व न्यायालयीन निकालप्राप्ती यामध्ये मोठा अंतर आहे. न्यायप्रक्रियेत होणारी अतिस्थिरता, प्रलंबित प्रकरणे, पीडितांच्या बाजूने सुरक्षात्मक उपायांची कमतरता हे सर्व महिलांच्या हिंसाचारविरुद्ध लढ्यात मोठे अडथळे आहेत. सामाजिक दृष्ट्या हे दाखवते की कायदा-व्यवस्था बदलण्यापुरती नाही, त्याबरोबर सामाजिक चेतना वाढवणे, समुदायांना जागरूक करणे आणि महिलांचे सकारात्मक बदल घडवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.एखाद्या समाजशास्त्रीय आराखड्यातून बघितले, तर महिलांवरील हिंसाचार तीन प्रमुख स्तरावर समोर येतो. व्यक्तिगत, संबंधात्मक आणि संरचनात्मक. व्यक्तिगत स्तरावर म्हणजे एखादी महिला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अनुभवते ते; संबंधात्मक स्तर म्हणजे तिच्या कौटुंबिक, वैवाहिक, नातेवाईक परस्पर संबंधात होणारी हिंसा; आणि संरचनात्मक स्तर म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती जे तिच्या असुरक्षिततेला जन्म देतात. NCRB 2023 च्या आकड्यांत या सर्व स्तरांचे प्रतिबिंब दिसते. उदा. पती-नातेवाईकाद्वारे क्रूरतेचे प्रमाण जास्त हे संबंधात्मक स्तरावरची समस्या दर्शवते; राज्यांमध्ये फरक हे संरचनात्मक असमानतेचा परिणाम आहे.या संदर्भात पुढे विचार करावा लागेल की महिलांना सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण देण्याऐवजी फक्त कायदे बनवणे पुरेसे नाही. साक्षरता, आर्थिक स्वावलं◌भ, सुरक्षित सार्वजनिक ठिकाणे, गर्दीपासून दूर चालण्यायोग्य रस्ते, रात्री महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हे सर्व उपाय आवश्यक आहेत. महिलांना निर्णय प्रक्रियेत भाग घेता यावे, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, ग्रामसभेतील निर्णय-प्रक्रिया, स्थानिक वाहिनींमध्ये महिला नेतृत्व वाढावे. त्यांनी स्वतःच्या जगण्याचा अनुभव बदलावा आणि समाजाने त्या बदलाला पाठिंबा द्यावा. ही प्रक्रिया वेगवान करण्यासाठी शाईप्रेरित कार्यक्रम, लोकशिक्षण, माध्यमांमाध्यमातून पुन्हा पुन्हा जनजागृती, स्त्री-पुरुष समता हे संदेश देण्यासाठी प्रभावी उपाय आवश्यक आहेत.शिक्षणाच्या क्षेत्रातही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बालविवाह बंद करण्यासाठी, लिंग-आधारित भेदभाव विरुद्ध लढण्यासाठी, लैंगिक समानतेचा भाव जागवण्यासाठी शाळांमध्ये नियमितपणे कार्यक्रम असावेत. तेथील शिक्षक-शिक्षिका, शाळांतील विद्यार्थी हे बदलाचे ध्रुव असू शकतात. समाजातील जुनाट लिंग-भूमिकात्मक अपेक्षांना प्रश्न विचारण्याची, महिलांना स्वावलंबी बनवण्याची जबाबदारी सर्वत्र आहे. घरी, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी आणि माध्यमांमध्ये.न्यायप्रक्रिया आणि कायदा-व्यवस्था या बाबतीत देखील बदल अनिवार्य आहेत. पोलीस तपासणीत महिलांना योग्य संरक्षण दिले जावे, त्यांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळावा आणि आरोपींचे शीघ्र निष्पादन व्हावे. महिला हेल्प-लाइन, वन-स्टॉप सेंटर, काउन्सेलिंग सेवा, पुनर्वसन कार्यक्रम आणि आर्थिक सहाय्य या कार्यक्रमांची कामगिरी नियमितपणे तपासली जावी. समाजातील सर्व घटक म्हणजे स्थानिक प्रशासन, गुन्हे नोंदविणाऱ्या विभाग, महिलांचे स्वावलंबन घटक, स्वयंसेवी संस्था हे एकत्र येऊन ॲक्टिव भूमिका बजावावी. वाढत्या सायबर-हिंसेच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन सुरक्षिततेबाबत जन-जागृती करणे तितकेच गरजेचे आहे.या सर्वांमुळे, आज २५ नोव्हेंबर या दिवशी आपण फक्त स्मरण करतो इतकेच नव्हे, तर वास्तवात उपयोगी, परिणामकारक पावले उचलण्याची प्रतिज्ञा करतो हे महत्त्वाचे आहे. NCRB 2023 च्या ताज्या आकड्यांमुळे आपल्यासमोर हिंसाचाराची विशाल पण गुप्त वाहिनी प्रकट झाली आहे आणि समाजशास्त्रीय दृष्ट्या हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की परिवर्तन हा एक प्रवास आहे. त्यात फक्त कायदा—व्यवस्था बदलणे पुरेसे नाही, तर सम्पूर्ण समाज बदलणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळा, प्रत्येक घर, प्रत्येक स्थानिक स्वयंसेवी संस्था, प्रत्येक माध्यम या यात्रेत सहभागी असावी. तरी हा दिवस अर्थपूर्ण ठरेल आणि प्रत्येक महिला सुरक्षित, सशक्त आणि समावेशी जीवन जगू शकेल.आजचा दिवस म्हणजे नुसता दिवाळी साजरी करणे नव्हे, तर त्या दिवशी नव्याने उघडलेल्या वास्तवाबद्दल जागरूक होण्याचा, बदलासाठी झोकून देण्याचा, आणि सामाजिक बदलासाठी वाहक ठरण्याचा दिवस आहे. २५ नोव्हेंबर म्हणजे स्मरण करण्याचाच नाही तर संरचना बदलण्याचा, संस्कृती बदलण्याचा, आणि प्रत्येक स्त्रीच्या हक्कांना सन्मान देण्याचा प्रवास पुढे नेण्याचा दिवस असावा. आपला समाज स्त्री-पुरुष समतेकडे वाटचाल करताना, प्रत्येक महिलेला हिंसाचारमुक्त जीवनाचा अधिकार आहे, हा दृढ विश्वास आपल्यात निर्माण व्हावा. हीच माझी प्रतिज्ञा आणि आपण सर्वांची जबाबदारी आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002